**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौंसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.सहदेव रामचंद्र झेंडे
भारत-भीम, ६२६४, बुधवार पेठ,
छत्रे तालीम गल्ली, मिरज, जि.सांगली

अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपनिबंधक, सहकारी संस्था,
हातकणंगले, जि.कोल्हापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा चेअरमन, दि प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्था मर्यादित,
वडगाव, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २४८ / सांगली /२००६ |
| २ | सुनावणीची तारीख(विशेष अपील निर्गत मोहीम) | दि.१४.५.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.सहदेव रामचंद्र झेंडे
भारत-भीम, ६२६४, बुधवार पेठ,
छत्रे तालीम गल्ली, मिरज, जि.सांगली

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपनिबंधक, सहकारी संस्था,
हातकणंगले, जि.कोल्हापूर श्रीमती निलिमा गायकवाड

**जन माहिती अधिकारी** तथा चेअरमन, दि प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्था मर्यादित,
वडगाव, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर श्री.सुरेश पाटील

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३०.११.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. -- |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |

| | |
|---|---|
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br>(माहितीचा कालावधी सन १९९७ ते २००६-२००७)<br>पतसंस्थेने वडगांव नगरपरिषद हद्दीतील बिनशेती जमीन, पडजमीन याचा भूमापन क्र./सर्व्हे नं.१२६ पैकी हिस्सा ११ ही जमीन मिळकत खरेदी घेतली आहे. जागेत संस्थेच्या मालकीची इमारत, तळमजल्यावर दुकान गाळे बांधले आहेत. पैकी दुकान गापळे भाड्याने, गहाणवट दिलेत अगर कसे, मासिक भाडे किती अथवा गहाणवटीची रक्कम गाळाधारकाकडून घेतली किंवा कसे. तसेच गाळ्यांचे लाईट बिल, पाणी बिल, नगरपरिषदेचे कर, कोण भरते. गाळे भाडे तत्वावर / मालकी तत्वावर घेण्यासाठी शासकीय कोठलेही परवानगी घेतली किंवा कसे, त्यांना करारपत्र करुन दिले आहे का, याबाबतची माहिती. |

## विवेचन

वरील तीनही घटकांमधील चर्चा, त्यांनी सादर केलेली निवेदने व चर्चेअंतीचा निष्कर्ष विचारात घेता, उभय बाजूंचे माहितीबाबत एकमत होऊन अपीलकर्त्यास माहिती देण्याचे मान्य करण्यात आले आहे.

अपीलकर्ता यांनी दि.२९/३०.११.२००६ रोजी अर्ज करुन जन माहिती अधिकारी तथा दि प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्था मर्यादित, वडगाव, ता.हातकणंगले यांच्याकडे माहिती मागितली होती. या अर्जाप्रमाणे माहिती मिळाली नाही, म्हणून अपीलकर्ता यांनी दि.२७.१.२००७ रोजी पहिले अपील अपिलीय प्राधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, हातकणंगले, जि.कोल्हापूर यांच्याकडे केले. त्यानंतरही माहिती न मिळाल्याने अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

सदरचे अपील हे दि.१४.५.२००८ रोजी सांगली येथील विशेष अपील निर्गत कार्यक्रमात समाविष्ट करण्यात आले होते. अपीलकर्त्याने दि.२९.४.२००८ (प्राप्त दि.२.५.२००८) अर्ज करुन आपणांस सदर तारखेस सकाळी हजर राहता येणे शक्य नसल्याचे दुपारी १.३० ते २.०० या दरम्यान हजर राहण्यासाठी अर्ज दिला होता. सदरचा अर्ज आयोगाने मंजूर करुन त्यांना दुपारी हजर राहण्याची परवानगी दिली. विशेष अपील निर्गत मोहिमे अंतर्गत भरलेले नमुनापत्र पाहता असे दिसून येते की, अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी बसून तडजोड झाली असे लिहून सह्या केल्या आहेत. परंतु नमुनापत्रामधील शास्तीबाबतची 'अपीलकर्त्याची

'अपीलकर्त्यास अपील व इतर खर्चापोटी १५०० रुपये दिले', असे नमूद केले आहे. अपीलकर्त्यास खर्चाची भरपाई देण्यासाठी जन माहिती अधिकाऱ्यांना अप्रत्यक्षरीत्या रु.१५०० दंड असा याचा अर्थ होतो. खर्च / नुकसानभरपाई देणे किंवा शास्ती करणे हा निर्णय घेण्याचा अधिकार फक्त आयोगाचा आहे. अपीलकर्त्याच्या भरपाईच्या मागणी बाबत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी अशा प्रकारे आर्थिक देवाण-घेवाणीची 'तडजोड' करणे हे अयोग्य, अनधिकाराचे व आक्षेपार्ह आहे, याची जाणीव सर्व संबंधितांना देण्यात येत आहे. अशा स्वरुपाच्या कृतीस आयोगाची मान्यता नाही. त्यामुळे आयोग या प्रकाराची गंभीर दखल घेत असून सर्व संबंधितांना याबाबत समज देऊन हा निर्णय रद्द करीत आहे.

सहकारी पतसंस्थांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ लागू नसल्याचा निर्णय राज्य मुख्य माहिती आयुक्त यांनी यापूर्वी अन्य अपिलांवर दिला आहे. तोच तूर्त अंमलात आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अमान्य करण्यात येत आहे.

(२) सहकारी पतसंस्थांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ लागू नसल्याचा निर्णय राज्य मुख्य माहिती आयुक्त यांनी यापूर्वी अन्य अपिलांवर दिला आहे. तोच तूर्त अंमलात आहे. मात्र मान्य केल्याप्रमाणे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी दि.१५.६.२००८ पर्यंत माहिती देऊन पूर्तता अहवाल आयोगाला सादर करावा.

(३) अपीलकर्त्याने खर्चापोटी जन माहिती अधिकारी यांच्याकडून रक्कम रुपये १५००/- घेण्याचा निर्णय आयोग रद्द करीत असून सदर रक्कम अपीलकर्त्याने दि.५.६.२००८ पर्यंत जन माहिती अधिकाऱ्यांना परत करुन उभय बाजूंनी तसे आयोगास सप्रमाण लेखी अवगत करावे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.३१.५.२००८**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,
चौथा मजला, कौन्सिल हॉलसमोर,
पुणे : ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. १३.५.२००८ रोजी कोल्हापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २५७ / कोल्हापूर |
| २ | अपीलकर्ता | श्री. वसंत शंकर पाटील<br>मु. पो. सातवे, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर |
| ३ | जन माहिती अधिकारी | गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, पन्हाळा, जि.कोल्हापूर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, कोल्हापूर |

अपीलकर्ता गैरहजर. अपीलकर्त्यास मागितलेली माहिती (पेन्शन मंजुरी पत्राची प्रत) उपलब्ध करून दिली असल्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी नमूद केले आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. २६ .५.२००८**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,
चौथा मजला, कौन्सिल हॉलसमोर,
पुणे : ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. १३.५.२००८ रोजी कोल्हापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २५७ / कोल्हापूर |
| २ | अपीलकर्ता | श्री. वसंत शंकर पाटील<br>मु. पो. सातवे, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर |
| ३ | जन माहिती अधिकारी | गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, पन्हाळा, जि.कोल्हापूर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, कोल्हापूर |

अपीलकर्ता गैरहजर. अपीलकर्त्यास मागितलेली माहिती (पेन्शन मंजुरी पत्राची प्रत) उपलब्ध करून दिली असल्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी नमूद केले आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. २६ .५.२००८**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

अपील क्र. २६६

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे डिसेंबर २००७ पर्यंतचा 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. १३.५.२००८ रोजी ताराराणी सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता.

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २६६ / कोल्हापूर |
| २ | अपीलकर्ता | श्री. संजय दिनकर गाडेकर<br>शाहूनगर, नवीन कमानीजवळ, कागल, ता. कागल<br>जि. कोल्हापूर - ४१६ २१६ |
| ३ | जन माहिती अधिकारी | मुख्याधिकारी, कागल नगर परिषद, कागल जि. कोल्हापूर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | उप आयुक्त, (सामान्य प्रशासन) पुणे विभाग, पुणे |

अपीलकर्त्याने दि. ९.५.२००८ रोजी आयोगाकडे दिलेल्या निवेदनानुसार त्यांना माहिती मिळाल्याने समाधान झाल्याचे नमूद केले असून अपील निकाली काढणेबाबत कळविले आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. २२.५.२००८**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

३१५-५-२६)



**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. १३.५.२००८ रोजी कोल्हापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २६७ / कोल्हापूर |
| २ | अपीलकर्ता | श्री. प्रकाश मारूती पिसे<br>मु.पो.ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर |
| ३ | जन माहिती अधिकारी | निवासी नायब तहसीलदार हातकणंगले, जि. कोल्हापूर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | तहसीलदार हातकणंगले, जि. कोल्हापूर |

वरील तीनही घटकांमध्ये झालेल्या चर्चेनुसार अपीलकर्त्यास सात दिवसात माहिती देणेचे ठरले.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी अपीलकर्त्यास चर्चेत ठरल्यानुसार सात दिवसात माहिती देऊन पूर्तता अहवाल आयोगास सादर करावा.

**पुणे**
**दि. २६ .५.२००८**

(राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ)

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयुक्त कार्यालय, पुणे विभाग, पुणे नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला, कौन्सिलहॉल समोर,
पुणे ४११ ००१

सौ. वैशाली कौस्तुभ कालेकर
१२] अवंतिका अपार्टमेंट,
शिवकला हौसिंग सोसायटी,मुकुंदनगर,
पुणे ४११ ०३७

अपीलकर्ता

**विरुध्द**

अपिलीय प्राधिकारी तथा अधिष्ठाता,
ससून सर्वोपचार रुग्णालय, पुणे
डॉ. अरुण व्ही. जामकर

उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा उप अधिक्षक ,
ससून सर्वोपचार रुग्णालय, पुणे
डॉ. उल्हास शंकरराव जाधव

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २६९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | ८.५.२००७ |
| ३ | उपस्थित | **अपीलकर्ता** - सौ. वैशाली कौस्तुभ कालेकर, शिवकला हौ. सोसायटी,मुकूंदनगर, पुणे<br>अपिलीय प्राधिकारी तथा अधिष्ठाता, ससून सर्वोपचार रुग्णालय, पुणे डॉ. अरुण व्ही. जामकर<br>**जन माहिती अधिकारी** तथा उप अधिक्षक , ससून सर्वोपचार |

| | | |
|---|---|---|
| | | रुग्णालय, पुणे<br>डॉ. उल्हास शंकरराव जाधव |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | ३०.१०.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | २९.११.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | ५.१२.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | २७.१२.२००६ |
| ८ | मूळ अर्जात मागणी केलेली माहिती | १. शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग एस.आर.व्ही. १०९९ /प्र.क्र. ६/१२ दि.८ मार्च १९९९ लागू न करण्याची कारणे कळविण्यात आली नाहीत ती कारणे कळवावीत.<br>२. अर्ज क्र.१ दि.२.१२.२००६ मधील शासन निर्णय लागू करण्याच्या दि. १८.०२.२००० रोजीच्या विनंती अर्जावर काय कार्यवाही करण्यात आली त्याचा तपशील उपलब्ध केला नाही तो तपशील मिळावा.<br>३. ३६५ दिवसापेक्षा जास्त सेवा झालेल्यांना पगारात वेतनवाढ देण्यांत येते, सन १९९४ पासूनच्या सलग सेवा असूनही अद्यापपर्यंत वेतनवाढ कुठल्या नियमाने देण्यात आली नाही. |

## विवेचन

सौ. वैशाली कौस्तुभ कालेकर (गुजर) या आपल्याला सेवत कायम करणे व वेतनवाढ आदि लाभ देणे या संदर्भात झालेल्या अन्यायाबाबत गेल्या १० वर्षांहून अधिक काळापासून दाद मागत आहेत. त्या संदर्भात त्यांना हवी असलेली माहिती व त्या अनुषंगाने अन्याय दूर करण्यासाठी न्यायालयात दाद मागण्यापासून, माहितीचा अधिकार अधिनियमातंर्गत विविध मार्ग त्या अवलंबत आहेत. दि. ३१.१०.२००६ रोजी त्यांनी मागितलेल्या माहितीबाबत दि. २९.११.२००६ रोजी ससून

सर्वोपचार रुग्णालयाच्या जन माहिती अधिका-यांनी दिलेले उत्तर माहिती देण्याऐवजी मुद्दे टाळणारे आहे. कोणतीही कागदपत्रे त्यांना देण्यात आली नाहीत. माहितीच्या अधिकाराव्यतिरिक्त केलेल्या अर्जांची वरिष्ठांनी दखल घेतली नाही. तसेच माहितीच्या अधिकारातंर्गत केलेल्या अर्जावर प्रथम अपिलाच्या बाबतीतही अधिष्ठाता, ससून सर्वोपचार रुग्णालय यांनी फारशी दखल घेतली नाही. 'अनियमीत कर्मचा-यांस वेतन वाढ लागू करण्याबाबतचे शासन निर्णय या कार्यालयास उपलब्ध नसल्यामुळे आपणास वेतनवाढी मंजूर करण्याबाबतचे मार्गदर्शन संचालकांकडून मागितले आहे. संचालकांकडून मार्गदर्शन प्राप्त होताच त्यानुसार पुढील कार्यवाही केली जाईल,' असे प्रथम अपिलावर दि. २७.४.२००६ च्या आदेशात अधिष्ठाता, ससून सर्वोपचार रुग्णालय यांनी नमूद केले आहे.

सौ. कालेकर यांना प्रयोगशाळा तंत्रज्ञ म्हणून निवड पध्दतीतून दि. २४.५.१९९४ रोजी ससून सर्वोपचार रुग्णालय, पुणे येथे नेमण्यात आले आहे. आजतागायत त्या तेथे त्या पदावर हंगामी/अनियमित कर्मचारी म्हणून काम करीत आहेत. प्रयोशशाळा तंत्रज्ञ या पदासाठी पदार्थ-विज्ञान, रसायनशास्त्र अथवा जीवशास्त्र हे विषय घेऊन बी.ए.स्सी. पदवी धारण करणे ही अर्हता कायद्यात नमूद केली आहे. डीएमएलटी असल्यास प्राधान्याची त्यात तरतूद आहे. बीएमटेक ही जीव, वैद्य, तंत्रज्ञान विषयातील पदव्युत्तर बीएसस्सी नंतरची उच्च पदवी आहे. डीएमएलटी पेक्षा उच्च श्रेणीतील अशी ही पदवी आहे. सौ. कालेकर या बीएमटेक पदवीधारक आहेत. ज्या हंगामी कर्मचा-यांनी शासकीय सेवेत सलग एक वर्ष पूर्ण केले आहे त्यांना सेवेत कायम करण्यात यावे, असे दि.८.३.१९९९ चे सरकारी परिपत्रक आहे. आपली शैक्षणिक अर्हता व सलग सेवा लक्षात घेऊन आपल्याला महाराष्ट्र शासनाच्या दि. ८.३.१९९९ च्या परिपत्रकानुसार सेवेत कायम करण्यात यावे, असा अर्ज सौ. कालेकर यांनी दि. १७.१.२००० रोजी अधिष्ठाता, ससून सर्वोपचार रुग्णालय यांच्याकडे व वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्य विभाग, मुंबइ यांच्याकडे दि. १८.२.२००२ रोजी केला. त्यांनी बी.जे.वैद्यकीय महाविद्यालय व ससून सर्वोपचार रुग्णालयाच्या अधिका-यांकडे सर्व अनियमित कर्मचा-यांची माहिती दि. २८.६.२००० च्या पत्रान्वये मागविली. परंतु 'ससून सर्वोपचार रुग्णालय व बी.जे.वैद्यकीय महाविद्यालय येथे कोणीही अनियमित कर्मचारी नाहीत,' अशी चुकीची माहिती अधिका-यांनी दि. १४.७.२००० च्या पत्रान्वये पाठविली. सौ. कालेकर यांच्या विषया संदर्भात वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्य विभाग, मुंबईने केलेल्या विचारणेला त्या पदार्थ विज्ञान, रसायन शास्त्र आणि जीवशास्त्र हे विषय घेऊन बीएसस्सी नसल्याचे उत्तर देण्यात आले. सौ. कालेकर यांनी दाखल केलेल्या दाव्यात कामगार न्यायालयातही ससूनच्या प्रशासकीय अधिका-यानी तसेच सांगितले. वस्तुत: पदार्थ विज्ञान, रसायन शास्त्र अथवा जीवशास्त्र यातील एकच विषय घेऊन बी.एस्सी. पदवी प्राप्त असणे नियमानुसार अपेक्षित आहे (व शैक्षणिक अभ्यासक्रमाच्या रचनेनुसार तसेच शक्य आहे, ही सर्वसामान्य बाब आहे). तरीही पदार्थ विज्ञान, रसायन शास्त्र अथवा जीवशास्त्र असे नमूद न करता आणि जीवशास्त्र असे दिशाभूल करणारे विधान ससूनच्या अधिका-यानी न्यायालयातही केले. त्या विहित अर्हतेपेक्षा उच्च पदवीधारक असतानाही व एक वर्षांहूनही अधिक काळ सेवा झाली असतानाही न्यायालयाचा निर्णय त्यांच्या विरोधात लागला. ससून सर्वोपचार रुग्णालयाच्या अधिष्ठाता यांनी दि. ३०.४.२००४ रोजी अनियमित कर्मचा-यांची

सेवा नियमित करणेविषयी निवड समिती नेमली. या समितीने इतर अन्य कर्मचा-यांच्या सेवा नियमित केल्या, परंतु सौ. कालेकर यांना कायम केले नाही. परिणामी १३ वर्षे सेवा करुन, गुणवत्तेबद्दल सेवाकालात पुरस्कार दिले गेलेले असताना व उच्च पदवी असूनही वेतनवाढ, कायम सेवा असा लाभ सौ. कालेकर यांना मिळालेला नाही. माहितीच्या अधिकारातंर्गत या सर्वांबाबत त्यांनी मागितलेली माहितीही त्यांना दिली गेली नाही.

वरील परिस्थिती लक्षात घेता सौ. कालेकर यांच्यावर झालेला अन्याय स्पष्ट होतो. त्याविरुध्द त्या प्रशासकीय पातळीवरील अर्जांबरोबरच न्यायालयीन संघर्षही करीत आहेत. त्यात त्यांना हवी असलेली व उपलब्ध असलेली माहिती ससूनचे संबंधित अधिकारी नाकारत आले आहेत. एकीकडे ही माहिती नाकारताना दुसरीकडे शैक्षणिक अर्हतेबाबत चुकीची अथवा दिशाभूल करणारी माहिती देत आले आहेत. डॉ. जाधव आणि डॉ.जगताप यांना सुनावणीच्या वेळी याची स्पष्ट जाणीव करुन देण्यात आली. सौ. कालेकर यांच्या बाबतीत चूक व अन्याय झालेला असल्याचे त्यांनी मान्य केले. केवळ माहिती देऊन न थांबता, चुकीची माहिती देणे व माहितीचा विपर्यस्त अर्थ लावण्यामु निर्माण झालेला प्रश्न सोडविण्याबाबत सकारात्मक कृती करणे आवश्यक आहे, हे वरील सव वस्तुस्थितीवरुन स्पष्ट होते. त्यामुळे या संदर्भातील वस्तुनिष्ठ माहितीवर आधारित अशा निश्चित कार्यवाहीबाबतची माहिती आयोगापुढे त्वरित द्यावी, असे आदेश त्यांना सुनावणी पूर्ण होताच दिले. या संदर्भातील चर्चेनुसार त्यांनी पुढील बाबी नमूद केल्या :

१. सौ. वैशाली कौस्तुभ कालेकर यांना शासन नियमानुसार वार्षिक वेतनवाढ देण्यात येत आहे.

२. त्यांना पाचव्या वेतन आयोगाची रक्कम रु. १७,०००/- अदा करण्यात आली असून उर्वरित रक्कम जून २००७ अखेर देण्यात येईल.

३. संचालक, वैद्यकिय शिक्षण व संशोधन, मुंबई यांचे पत्र क्र.सवैशिवंस/नियमित सेवा/श्रीमती कालेकर/प्रशालं/४/फ/२००७ दि. २.४.२००७ नुसार मा प्रधान सचिव, वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे श्रीमती वैशाली कौस्तुभ कालेक प्रयोगशाळा तंत्रज्ञ यांच्या दि. २८.६.१९९४ पासूनच्या सेवा नियमित करण्याबाबत प्रस्ता पाठविण्यात आलेला आहे. सेवा नियमित करण्याचे अधिकार शासनास आहेत. त्याबाबचा पाठपुरावा या कार्यालयामार्फत करण्यात येईल.

राज्य माहिती आयोगाकडील अपिलाच्या सुनावणीतील निर्णयामुळे आपले समाधान झाले असून तक्रार राहिलेली नाही, असे अपीलकर्त्या सौ. कालेकर यांनी नमूद केले आहे. आपण अलीकडेच पदभार स्वीकारलेला असून सौ. कालेकर यांच्यावर झालेल्या अन्यायाबाबत तातडीने कार्यवाही सुरु केली आहे, असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी सांगितले. ते सौ. कालेकर यांनी मान्य केले आहे. आपल्याला आवश्यक असलेली माहिती देण्याचे, तसेच आपल्यावरील अन्याय दूर करण्याबाबत जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिका-यांचे प्रतिनिधी यांनी मान्य केले असल्यामुळे आपले समाधान झाले असून शास्तीच्या स्वरुपाची मागणी नाही, असे

सौ. कालेकर यांनी स्पष्ट केले. मात्र प्रदीर्घकाळ आपल्याला झालेल्या मनस्तापाची आयोगाने दखल घ्यावी, अशी विनंती केली.

वरील पार्श्वभूमीचा विचार करुन मी पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :

## आदेश

१. सौ. कालेकर यांच्या संदर्भात डॉ. जाधव व डॉ. जगताप यांनी कबूल केल्याप्रमाणे वरील क. १,२ आणि ३ बाबतची कार्यवाही करावी.

२. सौ. कालेकर यांना आवश्यक असलेली माहिती एक आठवडयात दयावी.

३. माहिती मिळविण्याच्या प्रयत्नात सौ. कालेकर यांना झालेला मनस्ताप लक्षात घेता प्रतिकात्मक भरपाई म्हणून त्यांना रु. ५०००/- एवढी रक्कम माहितीचा अधिकार अधिनयम २००५ चे कलम १९(८)(बी) अन्वये ससून आस्थापनेच्या वतीने अधिष्ठाता, ससून सर्वोपचार रुग्णालय, पुणे यांनी दि. १५.६.२००७ पर्यंत अदा करावी.

पुणे
दिनांक :- २२/५/२००७

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे विभाग, पुणे

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयुक्त कार्यालय,
पुणे विभाग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे.१

श्री. हरीभाऊ जगन्नाथ बगाडे
३११/२, ससाणेनगर, हडपसर, पुणे-२८ अपीलकर्ता

विरुध्द

अपिलीय प्राधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक), उत्तरवादी
जिल्हा परिषद, पुणे
श्री. प्रकाश परब

जन माहिती अधिकारी तथा
उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, पुणे
श्री. डी. एस. भुजबळ

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २७४ /पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ८/५/२००७ |
| ३ | संबंधित | **अपीलकर्ता**<br>श्री. हरीभाऊ जगन्नाथ बगाडे<br>३११/२, ससाणेनगर, हडपसर, पुणे-२८<br>**अपिलीय प्राधिकारी** तथा<br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक),<br>जिल्हा परिषद, पुणे श्री. प्रकाश परब<br>**जन माहिती अधिकारी** तथा उप<br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा<br>परिषद, पुणे श्री. डी. एस. भुजबळ |

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३०.९.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २७.१२.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ३.१.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ४.७.२००६ |
| ८ | मूळ अर्जात मागणी केलेली माहिती | शालेय विभाग, महाराष्ट्र शासन यांनी दि. २ जुलै २००५ दि. १२ जुलै २००५ व दि. १७ जुलै २००६ , एका वर्षाचे वेतन, भत्ते फरकाची रक्कम आदा करणे, या विषयी लिहिलेली पत्रे व माध्यमिक शिक्षण संचालनालयाचे दि. २७.७.२००६ चे आदेश याबाबतची कार्यवाही, सद्यस्थिती |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. हरीभाऊ जगन्नाथ बगाडे हे छत्रपती विद्यालय वडगावरासाई, ता. शिरुर जि. पुणे या शाळेतील सेवानिवृत्त शिक्षक आहेत. वेतन व भत्ते, फरकाची रक्कम, भविष्य निर्वाह निधी आदी संदर्भात त्यांच्या अनेक तक्रारी आहेत. त्या अनुषंगाने त्यांनी चालविलेल्या प्रयत्नांचा एक भाग म्हणून माहिती अधिकार कायद्याखाली त्यांनी काही माहिती मागितली. दि. ३०.९.२००६ रोजी केलेला त्यांचा हा अर्ज शिक्षण उपसंचालनालय कार्यालयात दि. ३.१०.२००६ रोजी मिळाला. त्यात त्यांनी मुख्य माहितीच्या विषयासोबत एकूण ९ मुद्यांची माहिती मागितली आहे. श्री. बगाडे यांचे दि. १.१.१९९६ ते ३१.१२.१९९६ या वर्षीचे वेतन अदा करण्याबाबत दि. २.७.२००५, १२.७.२००५ व दि. १७.७.२००६ रोजी शालेय शिक्षण विभाग, माध्यमिक शिक्षण यांनी शिक्षण उप संचालक कार्यालयाला पत्रे पाठविली होती. तसेच माध्यमिक शिक्षण संचालनालयाने दि. २७.७.२००६ रोजी श्री. बगाडे यांच्या मागणी सत्वर पूर्तता करण्याचे आदेश शिक्षण उप संचालनालयाला दिले होते. या दोनही आदेशांबाबत झालेल्या कार्यवाहीची माहिती या अर्जात मागितली होती. (पत्र क्रमांक, पत्र मिळाल्याची तारीख, पत्र कोणत्या अधिका-याला कार्यवाहीसाठी दिले त्याचे नाव, हुद्दा व सुपूर्त केल्याची तारीख ), सेवा निवृत्ती वेतन, पाचवा वेतन आयोग, वरिष्ठ वेतनश्रेणी व संतोषनिधी, भविष्य निर्वाह निधी, अंतिम प्रदान या प्रत्येक बाबीसंबंधात झालेली कार्यवाही, त्यास जबाबदार असणारे अधिकारी, कामाचा टप्पा अशा स्वरुपाची तपशीलवार माहिती या अर्जात मागितली आहे. तसेच 'शिक्षण अधिकारी कार्यालय व वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक यांना आपले कार्यालय आदेश देऊ शकते काय ? (होय किंवा नाही) '
मुद्दा क्र. ८ : सदरच्या आदेशांची अंमलबजावणी अद्यापही झालेली नाही. या संदर्भात सन २००६ च्या महाराष्ट्र अधिनियम क्र.२१ नुसार कामकाजात दिरंगाई केल्याबद्दल कोणत्या अधिका-यावर व काय कारवाई करण्यात आलेली आहे व काय कारवाई प्रस्तावित आहे ?
मुद्दा क्र. ९ : संबंधित अधिका-यांवर कोणतीही कारवाई केलेली नसलेस कारणे द्या व प्रस्तावित असेल त्याची सविस्तर कारणे द्या अशीही विचारणा केलेली आहे.

जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, पुणे यांनी या अर्जाला कोणतेही उत्तर दिले नाही, म्हणून श्री. बगाडे यांनी दि. १३.११.२००६ रोजी अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी, (माध्यमिक), जिल्हा परिषद, पुणे यांच्याकडे अपील दाखल केले. त्याची सुनावणी दि. १९.६.२००६ रोजी होऊन ८ दिवसात माहिती देण्याचे आदेश अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी, (माध्यमिक), जिल्हा परिषद, पुणे यांनी दिले. तसेच 'अशी माहिती न मिळाल्यास अपीलकर्त्याने पुन्हा साधा अर्ज करावा,' असे आदेशात म्हटले आहे. जन माहिती अधिकारी यांनी दि. २७.१२.२००६ रोजी श्री. बगाडे यांना उत्तर पाठविले. 'माहिती अधिकारामध्ये कार्यालयाच्या अभिलेखात उपलब्ध असलेल्या कागदपत्रांच्या प्रतींच्या स्वरुपात माहिती पुरविणे अपेक्षित आहे. आपण विचारलेली माहिती प्रश्नोत्तरे स्वरुपाची आहे. तसेच आपल्याला देय असलेल्या वेतन, भत्ते, फरक रकमा, भविष्य निर्वाह निधी, अंतिम देय रक्कम याबाबत आपण अधीक्षक, वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक, पुणे-१ यांचेशी संपर्क साधवा. तसेच आपण नमूद केलेल्या पत्रांच्या प्रती समक्ष घेऊन जाव्यात,' असे या उत्तरात म्हटले आहे. माहिती देण्याची टाळाटाळ स्पष्ट करणारे हे उत्तर आहे. 'आपण नमूद केलेल्या पत्राच्या प्रती समक्ष घेऊन जाव्यात,' असे त्यांनी म्हटले असले तरी कोणत्याही प्रती मिळालेल्या नाहीत. त्यामुळे प्रती मिळाल्या नसल्याच्या कारणावरुन श्री. बगाडे यांनी अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी, (माध्यमिक), जिल्हा परिषद, पुणे यांच्याकडे पुन्हा दि. १.१.२००७ रोजी अर्ज केला. त्याची सुनावणी दि. २३.२.२००७ रोजी झाली. 'काही माहिती देणे आवश्यक आहे का, याची १० दिवसात पडताळणी करुन आवश्यक असेल तर ती माहिती द्यावी,' असे आदेश अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, पुणे यांनी दिले. दि. १६.३.२००७ रोजी काही कागदपत्रांच्या प्रती देण्यात आल्याचे श्री. बगाडे यांनी म्हटले आहे. मात्र पूर्ण माहिती मिळाली नसल्याचे नमूद करुन त्यांनी दि. ९.४.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे अपील दाखल केले.

श्री. बगाडे यांचा मुख्य प्रश्न देय असलेले वेतन व इतर आर्थिक लाभ मिळण्याचा आहे. त्यासाठी गेल्या काही वर्षापासून आपण झगडत असून आपल्याला शासकीय अधिका-यांच्या बेपर्वाईमुळे आपल्याला अत्यंत हलाखीला तोंड द्यावे लागले, असे त्यांनी व्यथित अंत:करणाने सुनावणीच्या वेळी सांगितले. या सर्व प्रकरणात झालेल्या मन:स्तापामुळे भावनोद्रेक होऊन त्यांना बोलणे अशक्य होते, म्हणून त्यांच्या वतीने आपण हे सर्व काम पहात असल्याचे त्यांचे चिरंजीव युवराज बगाडे यांनी सांगितले. त्यांच्या आर्थिक मागणीच्या संदर्भात आपली भूमिका सहकार्याची आहे, असे अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी श्री. प्रकाश परब, यांनी नमूद केले. मात्र त्यांची अशी भूमिका असली तरी आपल्याला अद्यापही पूर्ण माहिती मिळाली नाही, असे श्री. युवराज बगाडे यांनी स्पष्ट केले. जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी श्री. भुजबळ हे उत्तर न देण्याचे, विलंबाचे व योग्य ती माहिती न देण्याचे कोणतेही स्पष्टीकरण देऊ शकले नाहीत. 'श्री. बगाडे यांनी माहिती समक्ष हवी असल्याचे अर्जात म्हटले आहे. ही माहिती देण्यासाठी ते अथवा त्यांची मुले मुद्दाम आली नाहीत,' असा दावा त्यांनी केला. 'सुनावणीच्या वेळी आपली मन:स्थिती ठीक नसल्यामुळे आपण आपली बाजू मांडू शकलो नाही. श्री. बगाडे यांचे प्रकरण बारा वर्षापूर्वीचे असून आपण जुलै २००६ पासून उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक) या पदावर आलो आहोत. जाणूनबुजून माहिती टाळण्याचा आपला प्रयत्न नाही,' असे त्यांनी नंतर सादर केलेल्या लेखी निवेदनात म्हटले आहे.

श्री. बगाडे यांच्या पत्रात माहितीची मागणी प्रश्नोत्तर स्वरुपात आहे, हे माहिती न देण्याचे कारण होऊ शकत नाही. तसेच देय असलेले वेतन, भत्ते आदि बाबी संबंधी अधीक्षक, वेतन व भविष्य निधी पथक, पुणे यांचेशी सपंर्क साधणे ही स्वतंत्र बाब आहे. त्या बाबींची माहिती देणे ही जन माहिती अधिका-याची जबाबदारी आहे, ती श्री. भुजबळ यांनी योग्य प्रकारे पार पाडलेली नाही. अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) श्री. प्रकाश परब यांनी आपण दिलेल्या आदेशाची अमंलबजावणी होते की नाही हे पहावयास हवे होते व ते होत नसल्यास संबंधितावर कारवाई करणे आवश्यक होते. ते त्यांनी केलेले नाही.

शिक्षण विभागापेक्षा छत्रपती विद्यालय, वडगाव रासाई, ता. शिरुर व श्री. बगाडे यांच्यातील मतभेद हे या परिस्थितीचे मुख्य कारण आहे, असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांचे म्हणणे आहे. तशीच परिस्थिती असेल तर शिक्षण विभागाच्या वरिष्ठ अधिका-यांनी आपल्या वरील अन्यायाची गंभीर दखल घेऊन त्वरित उपाययोजना करावयास हवी होती, असे श्री. बगाडे यांचे म्हणणे आहे, ते रास्त आहे.

श्री. बगाडे यांनी मागितलेली माहिती अत्यंत तपशीलवार व विस्तृत स्वरुपाची आहे, त्या बरोबर वरील मुद्दा क्र. ८ व ९ मधील विचारणा खुलासा मागणारी आहे. माहितीच्या अधिकार कायद्याखाली अशी विचारणा करता येत नाही. मात्र ऊर्वरित मुद्यांची माहिती देणे शक्य व आवश्यक आहे. माहितीपेक्षा आर्थिक देयकांची पूर्तता ही श्री. बगाडे यांची मुख्य मागणी आहे, असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी सुनावणीदरम्यान नमूद केले. श्री. बगाडे व सुनावणीला उपस्थित असणारे त्यांच्या कुटुंबाच्या बोलण्यातूनही ते स्पष्ट झाले. आर्थिक मागणीची पूर्तता हा विषय माहितीच्या अधिकार कक्षेतील नाही. मात्र वयोवृध्द निवृत्त शिक्षकाला त्यासाठी बारा-बारा वर्षे झगडावे लागते, हे संबंधित शिक्षण संस्थेला व शिक्षण विभागाला भूषणावह नाही. या पार्श्वभूमीवर कायद्याबरोबरच मानवी भूमिकेवरुनही माहिती देण्याबाबत अधिक तत्परता दर्शविण्याची गरज होती व आहे.

वरील सर्व बाबींचा विचार करुन मी पुढील प्रमाणे आदेश देत आहे :

## आदेश

१. अपील मान्य.

२. खुलासेवजा विचारणा वगळता ऊर्वरित सर्व माहिती श्री. बगाडे यांना दि. १०.६.२००७ पर्यंत जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी द्यावी व ती दिल्याची खातरजमा अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, पुणे यांनी करावी. दोघांनीही संयुक्तरीत्या पूर्तता अहवाल दि. १५.६.२००७ पर्यंत आयोगाला सादर करावा.

३. अपीलकर्त्याला सर्व माहिती नि:शुल्क द्यावी.

४. अपुरी माहिती दिल्यामुळे अपीलकर्त्याला झालेल्या मन:स्तापापोटी भरपाई म्हणून माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९(८)(ब) नुसार रु. ५०००/- शिक्षण विभागाने दि. २०.६.२००७ पर्यंत द्यावे. ही रक्कम अपुरी माहिती देण्यास जबाबदार असणारे जन माहिती अधिकारी व अन्य संबंधित अधिकारी यांच्या वेतनातून कपात करुन द्यावी. अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, पुणे श्री. प्रकाश परब यांनी याची पूर्तता करुन आयोगाला अहवाल सादर करावा.

५. जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, पुणे श्री. भुजबळ यांनी माहिती देण्याबाबत आपण केलेले प्रयत्न निवेदन केले व मन:स्थिती ठीक नसण्याची कारणे स्पष्ट केली. ती मान्य करुन व माहिती देण्याबाबत यापुढे काटेकोर पालन करण्याची त्यांनी दिलेली हमी स्वीकारुन त्यांना शास्ती लावण्यात आलेली नाही. त्यांना याबाबत कडक समज देण्यात येत असून त्यांच्या वैयक्तिक अहवालात त्याची नोंद करावी.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे विभाग, पुणे

पुणे
दिनांक :- २९/०५/२००७

अपील क्र २६५                    अ सुनावणी                    87

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.प्रसाद गणपतराव धर्माधिकारी
संस्थापक छत्रपती ताराराणी विकास आघाडी शिरोळ कलादालन,
मु.पो.ता.शिरोळ, जि. कोल्हापूर-४३६००३ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
उद्योग भवन, जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ, कोल्हापूर-४३६००३ — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपप्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, उद्योग भवन, जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ, कोल्हापूर-४३६००३

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २७५ / कोल्हापूर /२००६ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १३.५.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.प्रसाद गणपतराव धर्माधिकारी
संस्थापक छत्रपती ताराराणी विकास आघाडी शिरोळ कलादालन,
मु.पो.ता.शिरोळ, जि. कोल्हापूर-४३६००३

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
कोल्हापूर उद्योग भवन, कोल्हापूर श्री.प्र.धों.कामे

**जन माहिती अधिकारी** तथा उपप्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
कोल्हापूर उद्योग भवन, कोल्हापूर श्री.नि.गु.निहुल

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२४.८.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १३.१२.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १९.१२.२००७ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br>पंचगंगा नदीतील दूषित पाणी प्रश्नी कर्तव्यात कसूर व हलगर्जीपणा केल्याप्रकरणी शिरोळ तालुक्याचे निवृत्त तहसीलदार श्री.अशोक कांबळे यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करण्याचे आदेश जिल्हादंडाधिकारी, कोल्हापूर यांनी दिले होते. याकामी होणाऱ्या कार्यवाहीबाबतची सर्व माहिती व आपलेकडून कार्यवाहीस विलंब झाल्याची किंवा होत असल्याची कारणे. तसेच आपण या प्रकरणी आपले कर्तव्य व अभिप्राय अहवाल काय आहे याची माहिती. | |

## विवेचन

पंचगंगा-कृष्णा नदीतील पाणी दूषित झाल्याच्या संदर्भात शिरोळचे निवृत्त तहसीलदार श्री.अशोक कांबळे यांच्यावर फौजदारी गुन्हा महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने दाखल करावा, या संदर्भातील अर्ज व तक्रारी याबाबतच्या कार्यवाहीची माहिती अपीलकर्ता श्री.प्रसाद गणपत धर्माधकारी यांनी मागितली होती. माहिती पाच दिवस उशिरा मिळाली, तसेच अपिलीय प्राधिकाऱ्यांनी श्री.कांबळे व अन्य अधिकाऱ्यांविरुध्द फौजदारी कारवाई करण्यास नकार देऊन अपील नाकारले, म्हणून श्री.धर्माधिकारी यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

नदीतील पाणी प्रदूषित झाल्याने मासे मरुन नागरिकांच्या व जनावरांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला. त्याला शिरोळचे तत्कालीन तहसीलदार श्री.अशोक कांबळे जबाबदार आहेत. म्हणून त्यांच्यावर फौजदारी कारवाई करावी, अशी मागणी श्री.धर्माधिकारी यांनी केली होती. तसेच शिरोळ पोलीस ठाण्यात या स्वरुपाची तक्रारही दाखल केली होती. त्यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्याचा आदेश कोल्हापूरच्या जिल्हाधिकाऱ्यांनी देऊनही कारवाई का केली गेली नाही, याबाबतची माहिती महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे श्री.धर्माधिकारी यांनी मागितली होती.

शिरोळ पोलीस ठाण्याकडे दिलेल्या पत्राची प्रत मंडळाकडे नव्हती, तसेच जिल्हाधिकारी कोल्हापूर यांनी दिलेल्या पत्राचा अर्जात नमूद केलेला जावक क्रमांक चुकीचा होता. त्यामुळे माहिती देण्यास पाच दिवसाचा विलंब झाला, असे जन माहिती अधिकारी तथा उपप्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूशण नियंत्रण मंडळ श्री.प्रमोद कामे व अपिलीय प्राधिकारी तथा प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, उद्योग भवन, कोल्हापूर श्री.नि.गु.निहुल यांनी त्यांच्या निवेदनात नमूद केले आहे.

श्री.धर्माधिकारी यांची मुख्य मागणी श्री.कांबळे व संबंधित अधिकारी यांच्यावर फौजदारी गुन्हा नोंदवावा ही आहे. अशी कारवाई महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ करु शकत नसल्याचे उत्तर विधी सल्लागाराच्या पत्रासह उत्तर जन माहिती अधिकारी श्री.प्रमोद कामे यांनी दिले आहे.

संबंधित विषयाबाबतची माहिती जन माहिती अधिकारी यांनी दिलेली आहे. तसेच अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या आदेशातही त्या संदर्भातील वस्तुस्थिती स्पष्ट केलेली आहे. मात्र जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाच्या अनुषंगाने करावयाच्या कार्यवाहीची माहिती महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या कक्षेत नसल्यास संबंधित प्राधिकरणाच्या जन माहिती अधिकाऱ्यांकडे त्यांनी तो अर्ज पाठविणे आवश्यक होते. 'सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी केलेल्या विनंतीप्रमाणे माहिती अधिकारी तथा उप-प्रादेशिक अधिकारी यांनी सी.पी.सी. कलम ९१ व सी.पी.सी.कलम ९३ प्रमाणे योग्य ती कार्यवाही करण्यासाठी अपिलार्थींच्या निवेदनाची प्रत मा.जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांना पत्र लिहून सादर करावी. तसेच सुनावणी दरम्यान माहिती अधिकार सुनावणीच्या अनुषंगाने दि.२२.११.२००७ रोजी दिलेल्या संबंधित पत्राच्या प्रतीसुध्दा मा.जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांच्या माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी सादर करावे,' असे अपिलीय प्राधिकाऱ्यांनी त्यांच्या निकालपत्रात नमूद केले आहे.

श्री.धर्माधिकारी यांनी उपस्थित केलेला मुद्दा सार्वजनिक महत्त्वाचा असला तरी संबंधित तक्रारीवरुन फौजदारी गुन्हा नोंदवावा, ही प्रशासकीय कारवाईची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत येत नाही. तसेच मच्छिमारांना नुकसानभरपाई मिळण्याची मूळ

अर्जात नसलेली मागणी त्यांनी आयोगापुढील अपिलात नमूद केली आहे. मूळ अर्जात नसलेल्या मागण्या नंतरच्या अपिलामध्ये करता येणार नाहीत.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अमान्य.

(२) अपिलीय प्राधिकाऱ्यांनी निकालपत्रात नमूद केल्याप्रमाणे जिल्हाधिकाऱ्यांकडे पत्र सादर करण्याबाबत झालेल्या कार्यवाहीची माहिती जन माहिती अधिकाऱ्यांनी हा आदेश मिळाल्यापासून आठ दिवसात अपीलकर्त्यास नि:शुल्क द्यावी.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. २६.५.२००८

मे-२००८-७१७४

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. १३.५.२००८ रोजी कोल्हापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २७६ / कोल्हापूर |
| २ | अपीलकर्ता | श्री. दिलीप अशोक देसाई<br>ए-२२, सरगम विहार अपार्टमेंट, जि.प. कार्यालयासमोर,<br>नागाळा पार्क, कोल्हापूर |
| ३ | जन माहिती अधिकारी | शहर अभियंता, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | आयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर |
| ५ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>सन २००६-२००७ मधील कोल्हापूर महानगरपालिकेने शहरातील रस्ते शासनाच्या व म.न.पा. च्या निधीतून केले आहेत त्याबाबत कामाची व नियोजनाची माहिती | |

वरील तीनही घटकांमध्ये झालेल्या चर्चेनुसार अपीलकर्त्याने मागितलेली माहिती मिळाली असल्याने कोणताही आक्षेप राहिला नसल्याचे नमूद केले आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. ३१.५.२००८**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. १३.५.२००८ रोजी कोल्हापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २७७ / कोल्हापूर |
| २ | अपीलकर्ता | श्री. अभयकुमार बाबुराव बरगाले<br>१६/७०, राजाराम रोड, इचलकरंजी, जि. कोल्हापूर |
| ३ | जन माहिती अधिकारी | सहाय्यक संचालक, नगररचना, कोल्हापूर महानगरपालिका |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | आयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर |
| ५ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br>१ एप्रिल २००५ ते ३० जून २००७ या कालावधीत कोल्हापूर महानगरपालिकेकडील बिगरशेती रेखांकनाच्या तात्पुरत्या मंजूर झालेल्या, परंतु अंतिम मंजुरीसाठी प्रलंबित असलेल्या प्रकरणांची माहिती | |

जन माहिती अधिकाऱ्यांनी कळविलेले शुल्क रू. ५५८/- अपीलकर्त्याने भरले नाही. वरील तीनही घटकांमध्ये झालेल्या चर्चेनुसार अपीलकर्त्याने शुल्क भरून माहिती प्राप्त करून घ्यावी, असा निर्णय झाला.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. अपीलकर्त्याकडून आवश्यक ते शुल्क भरून घेऊन जन माहिती अधिकारी यांनी देय माहिती उपलब्ध करून द्यावी व त्याबाबतचा पूर्तता अहवाल आयोगास हा आदेश मिळाल्यापासून दहा दिवसांत सादर करावा.

**पुणे**
**दि. ३१ .५.२००८**

(राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ)

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग ) यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. राजू लक्ष्मण पाच्छापुरे,
उत्तम टॉकीज मागे, जुना चंदूर रोड, तनंगे मळा,
दुर्गामाता चौक, मु.पो. इचलकरंजी,
ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर — अपीलकर्ता

विरुध्द

अपिलीय प्राधिकारी तथा — उत्तरवादी
तहसीलदार हातकणंगले,
ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर

जन माहिती अधिकारी तथा
पुरवठा निरीक्षक अधिकारी, इचलकरंजी,
ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २९१ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २२.१०.२००७ |
| ३ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | -- |
| ४ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ४.१२.२००७ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १७.४.२००६ |
| ६ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |

७ मागणी केलेली माहिती

जिल्हा पुरवठा अधिकारी, कोल्हापूर यांचेकडून इचलकरंजीसाठी आलेल्या रॉकेलचा कोटा व किरकोळ विक्रते यांना दिलेला रॉकेलचा कोटा तसेच हॉकर्स यांना दिलेल्या रॉकेल वाटपाबाबत कागदपत्रासहीत माहिती

## विवेचन

अपीलकर्ता श्री. राजू लक्ष्मण पाच्छापुरे यांनी इचलकरंजीसाठी आलेल्या रॉकेलचा कोटा व किरकोळ विक्रेते यांना दिलेला रॉकेलचा कोटा तसेच हॉकर्स यांना दिलेल्या रॉकेल वाटपाबाबतची माहिती मागितली होती. याबाबत जन माहिती अधिकाऱ्यानी माहिती न दिल्यामुळे अपीलकर्ता यांनी अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार हातकणंगले, जि. कोल्हापूर यांच्याकडे अपील केले. तथापि जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी दिलेल्या माहितीने समाधान न झाल्याने त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील दाखल केले आहे.

सदर अपिलाच्या अनुषंगाने अपेक्षित माहिती प्राप्त झाल्याने आपले अपील निकाली काढावे, असे श्री. पाच्छापुरे यांनी दि. ५.५.२००८ रोजीच्या अर्जात नमूद केले आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. २६ .५.२००८

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

---

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे मार्च २००७ पर्यंतचा 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. १४.५.२००८ रोजी अल्पबचत सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता.

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३०६ / सांगली |
| २ | अपीलकर्ता | श्री. आनंदा भाऊ गोरे<br>कृष्णा घाट, मिरज, ता. मिरज, जि. सांगली |
| ३ | जन माहिती अधिकारी | निवासी नायब तहसीलदार, मिरज, जि. सांगली |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | तहसीलदार मिरज, जि. सांगली |

अपीलकर्ता श्री. गोरे यांना माहिती अर्जाप्रमाणे माहिती व महापुरात झालेल्या नुकसानीची भरपाई मिळाली असल्याने आपली कोणतीही तक्रार नाही, असे त्यांनी दि. १४.५.२००८ रोजीच्या पत्रान्वये आयोगास कळविले आहे. तसेच वरील तीनही घटकांमधील चर्चेअंतीचा निष्कर्ष याप्रमाणेच नमूद केला आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि.** २२.५.२००८

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र पुणे खंडपीठ

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे मार्च २००७ पर्यंतचा 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. १४.५.२००८ रोजी अल्पबचत सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता.

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३१७ / सांगली |
| २ | अपीलकर्ता | श्री. कृष्णा भाऊ सुर्यवंशी<br>मु.पो. सावंतपुर, ता. पलूस, जि. सांगली |
| ३ | जन माहिती अधिकारी | निवासी नायब तहसीलदार पलूस जि. सांगली |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | तहसीलदार पलूस, जि. सांगली |

अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी हजर होते. अपिलीय प्राधिकारी गैरहजर होते. अपीलकर्त्याने तहसीलदार यांचे कोर्टातील रस्ता/एसआर/१०/२००५ दि. ३१.६.२००६ मधील निकालपत्र, अर्जदार व सामनेवाला यांच्या जाबजबाबाच्या नकला, पंचनामा इत्यादी कागदपत्रांची मागणी केली होती. तसेच रस्ता खुला करून देणेबाबत कार्यवाही करण्याची त्यांची मागणी आहे. जन माहिती अधिकारी यांनी वरील सर्व माहिती त्यांना दिली असल्याचे नमूद केले. तसेच अपीलकर्त्याने ते मान्य केले. संचिका स्वतः अवलोकन केल्याचेही मान्य केले. मात्र रस्ता खुला करून देणेबाबत त्यांचा आग्रह आहे. हा विषय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत येत नाही. या संदर्भात राज्य माहिती आयुक्त, पुणे खंडपीठाने दि. १७.१.२००८ रोजी निर्णय दिलेला आहे. ( अपील क्र. २ व ९५ )

वरील घटकांमधील चर्चा, त्यांनी सादर केलेली निवेदने व चर्चेअंतीचा निष्कर्ष विचारात घेता, अपीलकर्त्यास माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये देय माहिती देण्यात आली आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. २९.५.२००८**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**